ISSN No. 2394-9996

# ज्ञानेश्वर मुळे - `सुबह है की होती नहीं` एक आकलन

प्रा. राम मायकर
लोकमान्य टिळक महाविद्यालय,
ता. वडवणी, जि. बीड.

साहित्य विश्वामध्ये श्री ज्ञानेश्वर मुळे हे एक असे नाव आहे कि जे फक्त भारतीय भाषांमध्ये लिहिलेल्या त्यांच्या रचनावरूनच नव्हें तर त्यांाच्या विविध साहित्यिक प्रयोग धर्मितेमुळे देखिल जोड़ले गेले आहे. आपली बहुआयामी प्रतिभा फक्त भारतीय भाषांमध्ये लिहिलेल्या त्यांच्या विविध साहित्यिक प्रयोग धर्मितेमुळे देखिल जोड़ले गेले आहे. आपली बहुआयामी प्रतिभा फक्त वेगवेगळ्या साहित्यिक विधांमुळेच नाही तर वेगवेगळ्या भाषांमध्ये सुद्धा अभिव्यक्त होतांना दिसून येते. कथा, कविता, निबंध, डायरी, आत्मकथे बरोबरच यात्रा वृत्तांत लिहिण्यात ही आपला हातखंडा आहे. इंग्रजी, कन्नड आणि जापानी भाष्यांच्या आणि साहित्याच्या अभ्यासक्रमांमध्ये आपल्या रचना आहेत. म्हणूनच महाराष्ट्र सरकारने त्यांना `उत्कृष्ट कवितेचा पुरस्कार,` समन्वयश्री, परिवर्तनवादी कवि, इत्यादि पुरस्कार आणि सन्मान देऊन गौरविले आहे.

हिन्दी मध्ये `ऋतु उग रही है,` `मन के खलिहानों में` या काव्य संग्रहा बरोबरच प्रस्तुत कविता संग्रह सुबह है कि होती नहीं हा संग्रह आलोकपर्व प्रकाशन, नवी दिल्ली, ने सन् 2008 ई. मध्ये प्रकाशित केला आहे.

या संग्रहातील सर्वच्या सर्व 38 कविता अतिशय तोला - मोलाच्या आणि वैचारिक अधिष्ठान असलेल्या आहेत. ह्या कविता संबंध मानवी जीवनाच्या मुळाशी जाऊन मानवी धर्माची प्रतिष्ठा करतांना दिसून येतात. ऐकीकडे पोलिसांना `टारगेट कीलींग` आणि दूसरीकडे `आत्मघातकी हमले` करायला लावणाऱ्या आपल्या शासन व्यवस्थेविरूद्ध बंड करायला लावणाऱ्या ह्या कविता दिसतात. मध्यपूर्वे कडील देशांमध्ये जो सध्या अराजकतेचा आगडोंब माजला आहे. त्याची संबंध खरपूस विचारणा ह्या कविता करतांना दिसतात. तेथिल जीवन जेवढे विविध संकटांनी आणि प्रश्नांनी व्यापलेले आहे ते शब्दांमध्ये मांडणे कठीणच. परंतु तरीही कवि ज्ञानेश्वर मुळे यांच्यातील सृजनशील कलावंत आणि मनुसकीचा ओलावा लाभलेला प्रतिभावंत

रचनाकार नेमक्या शब्दांमध्ये मांडतांना दिसून येतो. खरे तर ह्या सर्व अमानवीय, अवर्णनिय गोष्टींसाठी व्यास, वाल्मिकी किंवा होमर सारख्या कविंची गरज आज आहे. तरी ही कवि ज्ञानेश्वर मुळे खरोखरच आपल्या नावाला साजेसा प्रयत्न करतांना येथे दिसून येतात. ते कविता संग्रहाच्या भूमिकेमध्येच सांगून ठेवतात कि `` मै महाकवि नहीं हूँ मगर समय ने यह काम मुझ पर सौंप दिया। मैं सिर्फ कोशिश कर सकता हूँ। यह कविता इसी प्रेरणा से जन्मी है।``[(1)] सांगायचे झाल्यास कविची जी प्रामाणिकता आहे ती सुद्धा शब्दातील आहे.

संग्रहातील पहीलीच कविता `शांति की अफवाहें` मनाला अस्वस्थ करून जाते. प्रत्येक देशाची आपली राजकीय नीति आणि कृति असते. वर वर जरी सर्व कांही सुस्थितित आणि शांतता पूर्ण चाललेले दिसत असले तरी सुद्धा तेथील वास्तव जीवन वेगळे आणि अस्थिर, अशांत व भयभीत असलेले वास्तव चित्र आहे. कवि म्हणतो फक्त शांती ची नारेबाजी सर्वत्र चालली आहे. अहिंसेचा बोलबाला फक्त पुस्तकातच आहे. राजकीय निवडणुकांपुरते वातावरण विकासाचे अभासी चित्र निर्माण करणारे आहे. मोठी मोठी पोस्टर्स आणि बॅनर्स लावून फक्त ते हवा निर्माण करतांना दिसतात. परंतू सत्य फार वेगळे आहे. गाजापट्टीतील चार हजाराहून ही अधिक रहिवासी विस्थापित केले गेले. काही क्षणापुरत्या बंदाकाही मुक्या होतील पण काय हे खरे आहे? जिथे स्वत: यासर आराफात जाऊ शकत नाहींत तेथे अब्बास कसे काय चालतील. काय त्यांचे पाय डगमगनार नाहीत? काय खरोखरच इस्त्रायली भिंती आणखी उंच होतील? जिथे भयानक भितीदाय वातावरण, द्वेष, मत्सर, भेदभाव आहे. तेथे शांती नांदू शकेल काय? असा प्रश्न कवि करतांना दिसतो. म्हणूनच कवि म्हणतो.

``पता नहीं मगर कमबख्त अफवाहें

फैलती जा रही हैं

जास्मिन की खुशबू की तरह

और जी चाहता है कि

मैं मान लूँ ..... शांति आएगी ``

म्हणूनच कवि म्हणतो शांति काय लपवा-छपवीचा खेळ आहे की काय? कवितेमध्ये ज्या येरूशलेम आणि फिलिस्तीन चा उल्लेख येतो. तेथील मानसांचे जीवन किती भेदरलेले आणि असूरक्षित असेल याची कल्पनाच करवत नाही. स्वातंत्र्यासाठी

तेथिल जनता तानाशाही बादशहांसमोर भीक मागतांना दिसून येते. परंतु यासर अराफात च्या रूपाने मानवी चेहरा तेजोमय होतांना दिसतो.

`अराफात के बाद` या कवितेमध्ये कविने इस्त्राइल आणि फिलिस्तीनी जनतेची चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणतात कि यासर अराफात गेल्या नंतर तेथील जनतेचे काय होणार आहे कुणास ठाऊक म्हणूनच कवि ज्ञानेश्वर मुळे `आराफात` यांचे आभार तर व्यक्त करतांना त्याच बरोबर राष्ट्रीय अस्मितेची नवी ओळख देखील करून देतांना दिसतात कवि म्हणतो—``

``राष्ट्रभक्ति का संगीत चल रहा है
अराफात के बाद
आखिरी बार हेलिकॉप्टर से
उठाये जाने वाले अराफात
अपनी मिट्टी को चूमना चाहते थे
अपनी आँखों से विदा ले रहे थे
एक मुल्क जिसे आजाद करने के लिए
वे जी रहे थे।``[3]

एका खऱ्या राष्ट्राध्यक्षाची अपेक्षा काय असू शकते याचे नेमके आणि बोलके उदाहरण म्हणजे प्रस्तुत कविता आहे. आज मित्तीला जी जी राष्ट्रे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रीसुत्री ची अपेक्षा करतात त्यामध्ये फिलिस्तीनचाही उल्लेख प्रामुख्याने आणि प्रकर्षाने करावा लागेल. आणि म्हणूनच एक आगळी - वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी तेथील जनता धडपड करतांना दिसते. आशेचा किरण त्यांच्या अंगणामध्ये नवी पहाटेची चाहूल घेऊन येतांना दिसतो आहे. नव्या निर्मितीची अपेक्षा घेऊन जगण्याबरोबरच भविष्याचे स्वप्न साकार होतांना ह्रदयातील स्पंदनं अधिकाधिक गतिशील होतांना दिसतात.

कवी म्हणतोय —— `` मैं अपने बच्चों को उन झूलों पर झूलते देखना चाहता हूँ
उनकी किलकारी सुनना चाहता हूँ``[4]

एक आशावादी सुंदर चित्र कवीच्या डोळयासमोर उभं राहते जे क्षितिजाच्या पलिकडले जरी असले तरी एक न एक दिवस ते सत्याच्या रूपातं साकार होऊन अवतरेल. यात शंका नाही. छावनी मधील भयभीत वातावरणात ही जगण्याची उमेद

घेऊन ताठ मानेनं उभी राहू पाहणारी शरणार्थी माणसं आशेवरच जगतांना पाहायला मिळतात. आणि ही आशाच कवीला कविता करण्याचं बळ देऊन जाते.

`देर अल बालाह` कवितेत ही शरणार्थींची घुसमट व्यक्त करतांना कवि आशावाद मात्र कायम ठेवण्याचा प्रयत्न करतांना दिसतो. गाजा पट्टीतील लहाण मुलांचे भविष्य तसे पाहता अस्पष्टच म्हणावे लागेल तरी परंतु त्या लहाण मुलांची आई त्यांना मोकळा श्वास घेण्यासाठी कांही वेळ का होईना बाहेर घेऊन येते आणि आकाशातील चंद्र चांदण्याच्या लिलयांबरोयबरच दूर देशी आकाशत उघडणाऱ्या फटाक्यांच्या आतीशबाजींचे उधळलेले रंग दाखवण्यात तल्लीन होऊन जाते. काही क्षणच का होईना पण आपल्या वाट्याला आलेले दुःखाचे तीमीर आणि वेदनेचे संचीत प्रारब्ध समजून विसरून जाते. त्याला उराशी कवटाळून बसत नाही. कवि म्हणतो —— ``मुझे आसमान देखना है ना सिर्फ फिलिस्तीन का मगर ईजिप्त हिंद अमेरिका का मैं पायलट बन सकता हूँ।``(5)

एकीकडे वैश्वीकरणाची भाषा करत असतांना आपण सर्वकांही मुक्त असल्याचा आभास निर्माण करत असतो आणि दूसरीकडे मात्र एक देश दूसऱ्या देशापासून सुरक्षित ठेवण्यासाठी दोघांमध्ये भींती बांधत असतांना दिसतो आहे. प्रत्येक देशाची स्पर्धा आज मितिला महासत्ता (Super Power) बणण्यासाठी चाललेली आहे. ही भीषण वास्तविकता कवि ज्ञानेश्वर मुळेंच्या कवितेची केन्द्रीय संवेदना आहे.

ते आपल्या `एक नई दीवार` या कवितेमध्ये म्हणतात -

``मगर स्वतंत्रता कौन रोक सकता है

उन्नीस सौ अड़तालीस से इंतजार कर रही है

बढ़ने लगी है धड़कने

दीवार गिरेगी

हर दीवार गिरेगी

क्योंकि हर दीवार गिर पड़ती है

या फिर गिरानी पड़ती है``(6)

मना-मनामध्ये स्वातंत्र्याच्या बीजारोपणाची भाषा करीत असतांना त्यापलीकडे भिंतीची तटबंदी लेखकाला नको आहे. म्हणूनच अशा भिंतींना पाडण्याखेरीज दूसरा पर्याय शिल्लक राहात नाही. पुढे ते म्हणतात.

``दीवार के बुर्ज

रोक रहे हैं

उम्मीद और आशा की किरणे

उदासी का एक नया रेगिस्तान बनाया जा रहा है

यहाँ यातनाओं की तुलना नहीं होती

उनसे वजूद बनता है।``(7)

कविची आर्तता आणि आगतिकता एकच आहे की, आपल्या भूमिपासून आणि आपल्या आप्त स्वककियां पासून त्याला हीरावून घेता कामा नये. विस्थापितांचे आणि स्थानांतराचे दुःख फार भयंकर आणि जीव घेणे असते. हे दुःख स्वप्नात ही पिच्छा सोड़त नाही. मनामध्ये धास्ती बसल्यानंतर जगणेच कठीण होते. ते आपल्या `गाँव बिलीन की चीख` या कवीतेच्या माध्यमातून सांगतात—

``मेरे पुश्तैनी खेतों में अजनबी लोग बना रहे हैं

बड़ी - बड़ी इमारतें, मुझसे मेरागाँव मेरी बस्ती

मेरी जमीं जबरदस्ती छीनी जा रही है

मेरा प्रिय बिलिन धँसता जा रहा है।``(8)

लाख प्रयत्न केल्यावरही आपण काहीच करू शकणार नाही हे माहित असून सुद्धा कवि म्हणतो आम्ही आमच्या घरादारांवर चालवल्या जाणारे बुलड़ोजर रोकण्यासाठी पुढे आलो.  परंतु फारसा उपयोग झाला नाही. आपणास माहित आहे की, हीच परिस्थिती आज सर्वत्र पहावयाला मिळते आहे. जागतिकीकरणातील विकास प्रक्रियेत कित्येक लहान-सहान घरे आणि संसार उद्ध्वस्त झालेली आपण पाहिली आहेत. सरकार आणि येथील गर्भश्रीमंत बिल्डर्स, कारखानदार आणि ठेकेदार गरीबांची शेती, जमीन बळकावण्यासाठी असूसलेले आहे. त्यांच्या जमिनीवर आपला मालकी हक्क बजावू पाहत आहे. गरीबांना देशोधडीला लावले जात आहे. ते म्हणतात.

``मुझे पता है

दीवार के उस पार

हवा कितनी सुहावनी है

भगवान ने कुछ सोचकर

बनाया था यह वतन

मगर इस दीवार ने

तितर-बितर कर दी है जिंदगी``(9)

मानसा मानसातील अंतर कमी करण्या ऐवजी असंतुष्ट लोक आणि राजकारणी सतत हेच प्रयत्न करतांना दिसतात की सामान्य लोकांमध्ये फूट कशी पाड़ता येईल. कवि ज्ञानेश्वर मुळे विदेशी राजकीय दुतावासामध्ये काम करत असतांना फिलिस्तिनच्या विस्तापणाचे दु:ख काय आहे. हे जाणून घेण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. एका संवेदनशील मानसाचा आत्मा कशा प्रकारे पर दु:ख कारता व्यक्त करतो आहे याचे दर्शन आपल्याला घडल्याशीवाय राहात नाही. आपल्याकडे मातृभूमि बद्दलचे प्रेम क्वचितच पाहायला मिळते. परंतु ज्ञानेश्वर मुळेंची प्रेम उद्भूत आणि अलौकिक आहे. ते आपल्या `अड़तालीस की जमीन` या कवितेमध्ये म्हणतात.——

``हमारी बस्ती के एक आदमी ने

अपने पेट में मिट्टी भर ली

ताकि उसके खून में उसकी जमीं बनी रहे

ताकि रगों में उसकी फिलीस्तिन पनपता रहे।``(10)

प्रस्तुत कवितेतील भावना मातृभूमि आणि तीच्या बद्दल व्यक्त होणारी कृतज्ञ भावना शब्दांच्या पलीकडची आहे. यासाठी मनामध्ये अपार श्रद्धा - प्रेम आणि समर्पण भावनाच इतकी बोलकी आणि मनाला भीड़नारी आहे की, वेगळ्या विश्लेषणाची आणि समीक्षेची गरज भासत नाही.

कवि ज्ञानेश्वर मुळे यांनी कविता सर्वसीमारेषांच्या आणि वेळ - काळाच्या पलीकडली आहे. विश्व मानव मुक्तिची कविता ते लिहित आहे. म्हणूनच कवितेचे आणि साहित्याचे भविष्य ही निश्चितच उज्ज्वल आहे. पारंपारिक कवितेच्या समीकरणातून आणि जोखडातून त्यांनी कवितेला मुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. जगाच्या आपआपसातील गुंतागुंतीची राजनीति ते अचूकपणे टिपतांना दिसतात. ते म्हणतात ——

``एक इंसान दो पाटों में बँट गया है

बीच में काँटेदार तार हैं

बारूदी सुरंगें हैं

और राष्ट्रसंघ की सेना भी``[11]

आज आपण प्रत्येक गोष्टींची वाटाघाटी केलेली आहे. देश वाटले, राज्यवाटली, शहरं वाटली, गांव वाटली, शेतं वाटली, मानसं वाटली, धर्म-जाति-वंश आणि मनं सुद्ध वाटली. वाटाघाटीसाठी यापुढे शिल्लक आहे तो मानसाचा आत्मा त्याच शरीर. अशी भयानक परिस्थिति आपल्यासमोर उभी ठाकली आहे. आणि आपण मात्र सर्व उघड्या डोळांनी त्याकडे बघतो आहोत. हे आश्चर्य.

**संदर्भ सूची :-**


1. सुबह है कि होती नहीं - ज्ञानेश्वर मुले - भूमिका से
2. सुबह है कि होती नही ˙ - ज्ञानेश्वर मुले - पृ .14
3. सुबह है कि होती नहीं - ज्ञानेश्वर मुले - पृ .15
4. सुबह है कि होती नहीं - ज्ञानेश्वर मुले - पृ .18
5. सुबह है कि होती नहीं - ज्ञानेश्वर मुले - पृ .20
6. सुबह है कि होती नहीं - ज्ञानेश्वर मुले - पृ .27
7. सुबह है कि होती नहीं - ज्ञानेश्वर मुले - पृ .28
8. सुबह है कि होती नहीं - ज्ञानेश्वर मुले - पृ .32
9. सुबह है कि होती नहीं - ज्ञानेश्वर मुले - पृ .38


☆☆☆